# सुटका

रामभाऊ व सीताबाई मुंबईत एका बैठ्या चाळीत रहात होते. रामभाऊ सरकारी नोकरीत होते. पगार, हुद्दा मोठा नव्हता. काटकसरीने रहायची सवय होती. पहिला रमेश, नंतर पाच वर्षांनी सुरेश व त्यानंतर तीन वर्षांनी सुरेखा अशी तीन मुले. मोठा ग्रॅज्युएट झाला, त्याला दुबईला जॉब मिळाला. त्याने तिकडून पैसे पाठवून सुरेशचे शिक्षण केले. तो आयटी मधे लागला. त्याला भरपूर पैसे मिळू लागले. पण चाळ सोडून जायचा विचार पटला नाही. त्यानी शेजारच्या दोन खोल्या चाळ सोडणा-या शेजारच्याकडून घेतल्या. भावांनी बहिणीचे लग्न करून दिले. नंतर भावांची पण लग्ने झाली. रमेशचे दोन मुलगे दुबईला, सुरेशचा मोठा मुलगा सात वर्षांचा व मुलगी चार वर्षांची. नातवंडे आजी आजोबांकडेच जास्त असायची कारण सुरेशची बायको पण शाळेत नोकरी करायची. आजोबा बाहेर जाऊन बाजाररहाट करायचे. ती त्यांची सवय झाली होती. रोज मार्केटपर्यंत गेल्याशिवाय चैन पडत नसे. आयुष्य चांगल्या त-हेने चालले होते. नुकताच रमेश सहकुटुंब येऊन गेला होता.

अचानक कोरोनाची वावटळ आली. लॉकडाउन सुरु झाला. बाहेर जायचे नाही. मास्क लावायचे, कामवाली नाही. बाबा घरातून ऑनलाइन काम करतात. आईला शाळा नाही पण काम भरपूर. मुले आजी व आजोबांच्या मागे. त्यांना पण नातवंडाचा लळा होताच. एकंदरीत ठीक चालले होते. आजोबा नियमित सकाळी फिरायला जात. येताना बाजारात जाऊन घरात काय हवे नको ते आणत. घरात रोज टीव्ही चालू असे. बातम्या कोरोना किती वाढतो आहे. चांगले डॉक्टर आजा-यांची चांगली काळजी घेतात पण काही डॉक्टर त्यातून पैसे काढाययला टपलेत हेही मिडिया वर येई. आजा-यांना मृत घोषित करून त्यांचे किडनी व इतर अवयव काढून विकले जातात. अशा बातम्यांनी सामान्य माणूस घाबरून जात असे. असे दिवस शांत, तरीही मनावर अदृश्य ताणात सरत होते.

एक दिवस रामभाऊ बाजारातून आले. दमल्यासारखे वाटले म्हणून थंड पाणी प्यायले व झोपले. जेवायला उठले तर तापाने फणफणलेले. लगेच सुरेशने फॅमिली डॉक्टरना बोलावले. त्यांनी औषध दिले पण कोरोना टेस्ट करायला सांगितले. टेस्ट झाली. पॉझिटिव्ह आली. आजोबांना हॉस्पिटल मधे दाखल केले. हॉस्पिटल मधे पेशंट्स खूप दाखल होत होते. सुरेश रोज जाऊन चौकशी करायचा. "बरे आहे, ठीक आहे" अशी उत्तरे मिळायची. त्यांना भेटायला, निदान लांबून बघायला पण मिळत नव्हते. आपले वडील काटक आहेत. त्यांची तब्येतीची तक्रार कधीच नसायची. त्यांना करोना झालाच कसा? असा त्याला प्रश्न पडायचा.

असे पंधरा दिवस गेले. रोजच्यासारखा तो सकाळीच बाबांच्या चौकशीला आला. तुझ्या वडिलांचे नाव

RG ना. तो म्हणाला, "रामभाऊ गायकवाड?" "हो हो तेच RG. सॉरी ते आज सकाळीच वारले." त्याच्या डोळ्यापुढे अंधारी आली. त्याला सांगितले की तुम्ही स्मशानात जा. तिथे तुम्हाला बॉडी मिळेल. तिला अग्नि द्या. कोणाला बोलवू नका. आज सात बॉड्या नेताहेत. जड मनाने तो व्हॅन बरोबर गेला. विद्युत दाहिनीमधे नंबराप्रमाणे दहन झाले. घरी आला. नेहमी प्रमाणे डोक्यावरून आंघोळ केली. घरी आईला कसे सांगायचे ? त्याला काहीच सुचत नव्हते. शेवटी त्याने बायकोसमोर मन मोकळे केले. रडून दूःख हलके केले. सुनेने सासूला सांगितले ती एकदम गप्पच झाली. मुलांची जेवणे झाली. आणखी कोणी जेवलेच नाही. रमेशला कसे कळवायचे ? आणि उपयोग काय? त्याला येता येणार नाही. मग सावकाशीने कळवू असा विचार केला. सगळं घर अती शांत झालं होत. वेळ सरत नव्हता आणि कळत नव्हता. अचानक दारावरची बेल वाजली सुरेशने जाउन दार उघडले तर समोर रामभाऊ उभे. क्षणभर तो गळफटलाच. सकाळी यांचे मी स्वहस्ते दहन केले. आईला भेटायला हे भूत बनून आले की काय? त्याच्या तोंडून शब्दच फुटेना. इतक्यात त्याच्या मागून कोण आले म्हणून पहायला आलेल्या त्याच्या दोन्ही मुलांनी "आजोबा" म्हणत त्याना मिठी मारली व ते घरात आले.

नंतर ते म्हणाले, "माझ्या शेजारचा रमाकांत गायधनी काल खपला. दोन दिवसांपूर्वी तो ठीक होता. आज मी डॉक्टरना विचारले माझी तब्येत कशी आहे? ते म्हणाले चांगली आहे. मी घरी जाऊ शकतो क? तर ते हो म्हणाले तेव्हा मी सरळ उठलो, सर्वांची नजर चुकवून बाहेर पडलो व चालत आलो. रस्ता महितीचा त्यामुळे प्रश्न आला नाही. खूप भूक लागली आहे. गरम पाण्याने आंघोळ करतो. मला जेवायला वाढ."

**नलिनी करंडे**